

बीड येथील खं डेश्वरी देवी

# ।। ज्योतिर्मय ।।

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २०२ वा ❑ शनिवार दि.२७ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

## पालकांनो..!! पाल्यांवर अपेक्षांचे ओझे लादू नका?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, जिथे मध्ये ९९.९९ पर्सेंटाईल मिळवणाऱ्या १९ वर्षीय अनुराग या विद्यार्थ्याने वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी निघण्याच्या दिवशीच आत्महत्या केली.अनुरागच्या आत्महत्येने परत एकदा विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अनुराग त्याच्या कुटुंबासह चंद्रपूर येथील सिंदेवाही तालुक्यातील नवागाव येथे राहत होता आणि त्याने नुकतीच २०२५ ची परीक्षा ९९.९९ टक्के गुणांसह उत्तीर्ण झाली आणि श्रेणीमध्ये १४७५ वा अखिल भारतीय क्रमांक मिळवला. तो प्रवेशासाठी उत्तर प्रदेशातील गोरखपूरला जाण्याची तयारी करत होता.

विशेष म्हणजे अनुरागला डॉक्टर बनायचे नव्हते,असे त्याच्या मृत्यूपूर्व लिहिलेल्या नोटधून समोर आले आहे. गोरखपूरला जाण्यापूर्वी अनुरागने घरी गळफास घेतल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

अनुरागच्या आत्महत्येने अनेक प्रश्न उपस्थित होतात.

नीट परीक्षेत गुणवत्ता यादीत येऊन देखील त्याने आत्महत्या का केली? अनुरागला डॉक्टर व्हायचे नव्हते त्याला व्यापार करायचा होता असे त्याने लिहिलेल्या सुसाईड नोट मधून समोर आले आहे. मग प्रश्न हा निर्माण होतो की त्याला वैद्यकीय क्षेत्राकडे वळायचे नव्हते तर त्याने नीट परीक्षेचा अभ्यास का केला? दुसरी गोष्ट म्हणजे तो अभ्यासात कुठेच कमजोर नव्हता..नीट परीक्षेत त्याला ९९.९९ टक्के मार्क्स मिळाले होते...इतका हुशार विद्यार्थी आत्महत्या कसा काय करतो? कुठल्यातरी मानसिक दबावात येऊन त्याने टोकाचे पाऊल उचलले असावे.विशेष म्हणजे याबाबत आई वडिलांना थोडी पुसटशी देखील कल्पना आली नाही का? वैद्यकीय क्षेत्राकडे वळायचे नाही याबाबत त्याने आई–वडिलांची वार्तालाप केला नव्हता का? केला असेल तर आई–वडिलांनी त्याला समजून घ्यायला पाहिजे होते. अनुरागच्या आत्महत्येने अनेक प्रश्न निर्माण होतात.

प्रश्न एका अनुरागचा नाही. प्रश्न विद्यार्थी आत्महत्या का करतात,याचा आहे? विद्यार्थी आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त का होतात? विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव असतो काय? आई वडील आपली इच्छा आपल्या पाल्यांवर लादतात का? मुलांवर अपेक्षांचे ओझे का लादतात? आई वडील आपल्या मुलांची संवाद साधतात काय? आपल्या पाल्याची इच्छा आकांक्षा समजून न घेता त्याला आपल्या इच्छेप्रमाणे क्षेत्र निवडण्यास भाग पाडतात काय? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची गरज आहे. याबाबत विचारमंथन होण्याची गरज आहे. पालकांनी व समाजाने याबाबत सावध व तितकेच सतर्क राहण्याची गरज आहे.

आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या बहुतेक मुलांना आणि किशोरांना गंभीर मानसिक आरोग्य विकार असतो, सहसा नैराश्य. लहान मुलांमध्ये आत्महत्येचे प्रयत्न बहुतेकदा आवेगपूर्ण असतात. हे प्रयत्न दुःख, गोंधळ, राग किंवा लक्ष आणि अतिक्रियाशीलतेच्या समस्यांशी संबंधित असू शकतात.राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्यूरो () ने आपल्या ''भारतात आकस्मिक मृत्यू आणि आत्महत्या'' (२०२२) अहवालात पायावर झालेल्या आत्मघातकी एकूण प्रकरणांमध्ये ७.६% विद्यार्थी संबंधित आहेत.

२०१२ ते २०२२मध्ये मध्यवर्ती पुरुष विद्यार्थ्यांच्या अपघाताच्या घटनांमध्ये ९९% आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमध्ये ९२% वाढ झाली आहे.

भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची इतर कारणे कोणती आहेत? तर सक्तीच्या करिअर निवड हे एक महत्वाचे कारण म्हणून सांगता येईल.

आपल्या देशात, सामान्यतः बरेच विद्यार्थी खूप जास्त दबावाला बळी पडतात, विशेषतः त्यांच्या कुटुंबाकडून आणि शिक्षकांकडून त्यांच्या करिअरच्या निवडी आणि अभ्यासाच्या बाबतीत. पालक विद्यार्थ्यांच्या इच्छा आकांक्षाचा विचार करत नाही. खरं तर पालकांनी आपली इच्छा मुलांवर लादू नये.. पाल्यांना आवडी प्रमाणे त्याच्या पसंतीचे क्षेत्र निवडू द्यावे.

कमकुवत शिक्षण व्यवस्था हे देखील एक कारण म्हणून सांगता येईल.

उच्च दर्जाच्या संस्थांमध्ये जागा मिळवण्याच्या दबावामुळे आणि सतत वाढणाऱ्या कट–ऑफमुळे, बरेच विद्यार्थी हार मानतात आणि आत्महत्येसारख्या गंभीर गोष्टीचा अवलंब करण्यास भाग पाडतात.

या संदर्भात, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. संजय चुघ विचारतो'' आपण आपल्या मुलांना अशा मूर्खपणाच्या गोष्टी का दाखवतो, जिथे परीक्षा ही करो या मरची परिस्थिती बनली आहे जिथे विद्यार्थ्यांना चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी किमान टक्केवारीची आवश्यकता असते?'' तो असेही नमूद करतो की विद्यार्थ्यांना अशा गोष्टी शिकायला लावल्या जातात ज्याची त्यांना आयुष्यात कधीही गरज भासणार नाही.

विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या बहुतांश घटनांमध्ये, कारणे अज्ञात असतात. कदाचित पीडित व्यक्ती शेवटच्या वेळीही त्यांच्या चिंता व्यक्त करण्यास सोयीस्कर नव्हती म्हणून असे असू शकते का? त्यांनी शांतपणे दुःख सहन करणे का निवडले?

बऱ्याच प्रकरणांमध्ये, असे घडते की पीडितांना त्यांच्या पालकांसोबतही, त्यांच्यावर होणाऱ्या दबावाबद्दल मुक्तपणे त्यांच्या चिंता व्यक्त करणे कठीण जाते. अशाच एका प्रकरणात गेल्या वर्षीचा खटला, अंजली आनंद या विद्यार्थिनीने आत्महत्या केली, कारण तिला वाटले होते की ती ज्या परीक्षेची तयारी करत होती त्यात चांगली कामगिरी करणार नाही.कदाचित असेच कारण...अनुराग बाबतीत झाले असावे

त्यातून प्रश्न असा निर्माण होतो की, जर तो त्याच्या पालकांशी मोकळेपणाने यावर चर्चा करू शकला असता तर त्याचा फायदा झाला नसता का?पण विद्यार्थी बोलत नसतात..बोलले तर त्यांना बोलू दिले जात नाही.

काय केले पाहिजे ?

पालक आणि शिक्षकांनी त्यांच्या मुलांची क्षमता आणि क्षमता समजून घेण्याचा प्रयत्न करणे महत्वाचे आहे. केवळ त्यांच्यावर दबाव आणणे आणि त्यांच्या शैक्षणिक कामगिरीतील खराब कामगिरीसाठी त्यांना दोष देणे हे त्यांच्या दुःखात भर घालणार आहे. यामुळे ते शांतपणे दुःख सहन करतील आणि त्यांना एकटेपणा जाणवेल. एकटेपणा आणि ताण एकत्रितपणे त्यांना हळूहळू नैराश्याकडे नेऊ शकतात.

विद्यार्थ्यांनी हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की आत्महत्या हा उपाय नाही. ती केवळ त्यांचे स्वतःचेच नाही तर इतर अनेक जीवन उद्ध्वस्त करते. त्यासाठी मदत उपलब्ध आहे! असे समुपदेशक, मानसशास्त्रज्ञ आणि अगदी खास मित्र देखील आहेत जे त्यांना या समस्येचा सामना करण्यास मदत करण्यास तयार आहेत.

विद्यार्थी देशाची अनमोल संपत्ती आहे.विद्यार्थी हे उद्याचे भविष्याचे नागरिक आहेत.देशाचे उद्गाते आहेत.विद्यार्थ्यांनी आत्महत्या करणे,हे देशाचे फार मोठे नुकसान आहे.उद्याचे ,भविष्याचे आपण नागरिक गमावत आहोत. विद्यार्थ्यांमधूनच उद्याचा भविष्याचा नागरिक घडणार आहे.कोणी विद्वान, तर कोणी शास्त्रज्ञ होणार आहे.कोणी राजकारणी तर,कोणी राष्ट्रपती,तर कोणी पंतप्रधान,तर कोणी देशाचा सैनिक.म्हणून विद्यार्थ्यांनो आत्महत्येसारखे पाऊल उचलू नका.तुमची समाजाला व देशाला गरज आहे.. पालकांनो तुम्ही देखील अवास्तव स्वप्न बघू नका,अवास्तव इच्छा पाल्यांवर लादू नका.

अलिकडे पालक आपल्या मुलांच्या भविष्याबद्दल फारच अतिसंवेदनशील होत चालल्याचे निदर्शनास येत आहे. ते वर्तमान परिस्थितीत कृतीने हरवलेले आणि भविष्यकालीन स्थितीत कल्पनेने स्थिरावलेले दिसतात. वर्तमानाचा स्वीकार केला नाही की, अपेक्षित भविष्य आपण घडवू शकत नाही. वर्तमान आणि भविष्य यामध्ये अलिकडे बहुतांश पालक फार गफलत करताना दिसतात.

'मुलांना त्यांची आवड क्षमता व कलाप्रमाणे शिकू द्या म्हणजे त्यात ते चांगली प्रगती करण्यासह आनंददायी जीवन व्यतीत करू शकतील' याबाबत आपल्याकडे बरीच जागृती होत असली तरी यातून अद्याप तरी अपेक्षित प्रमाणात पालक जागृत होऊ शकले नाहीत हे खरे आहे, पण मुलांच्या दृष्टीने त्यांची आवड क्षमता व कल पाहून शिक्षणक्रमाची निवड करणे हे अत्यंत महत्त्वाचे असतानाही बहुतेक ठिकाणी या महत्त्वपूर्ण बाबीला पालकांकडूनच बगल दिली गेल्याची अनेक उदाहरणे सापडतात. आपली आणि आपल्या मुलांची स्वप्ने कदाचित वेगळी असू शकतात हे ओळखून आपली स्वप्ने त्यांच्यावर लादून अतिरिक्त दडपण देण्याचे प्रकार पालकांनी थांबवण्याची गरज आहे.

## हैदराबाद मुक्ती संग्राम हा आपल्या स्वाभिमानाचा अध्याय–डॉ.अनुपम टाकळकर

### पाठ्यपुस्तकांत या लढ्याचा धडा असायलाच हवा–श्री सुहास सरदेशमुख

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर येथे नुकताच हैद्राबाद मुक्ती संग्राम दिन उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विविध मान्यवर वक्ते, पाहुणे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष व सचिव यांच्या भाषणाने झाली. त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित केले व हा दिवस साजरा करणे ही खरी कृतज्ञतेची भावना असल्याचे सांगितले. मुख्य पाहुणे श्री. सुहास सरदेशमुख लोकसत्ता वृत्तपत्राचे संपादक, यांनी आपल्या प्रभावी भाषणातून तत्कालीन पोलिस ॲक्शनची माहिती दिली. त्यांनी सांगितले की भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले असले तरी हैद्राबाद प्रदेश निजामाच्या अधिपत्याखालीच राहिला आणि एक वर्षानंतर मुक्ती मिळाली. त्यांच्या विश्लेषणातून श्रोत्यांना त्या काळातील राजकीय घडामोडींचे सखोल चित्र समजले. आज घडीला विद्यार्थ्यांना हैदराबाद मुक्ती संग्रामातील नेत्यांची विशेष माहिती नाही ती करून देण्यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले पाहिजेत असे ते म्हणाले त्यासाठी शालेय अभ्यासक्रमामध्ये मुक्तिसंग्रामावर आधारित किमान एक तरी पाठ हवा असे मत त्यांनी व्यक्त केले.

डॉ ऊर्मिला चाकूरकर, कार्यक्रम समन्वयक व सूत्रसंचालक, यांनी त्यांच्या कुटुंबाच्या स्वातंत्रलढ्यात असणाऱ्या सक्रिय सहभागाबद्दल वैभवशाली परंपरेचा अभिमान व्यक्त करताना त्यांनी उपस्थितांना प्रेरणा दिली. शामराव बोधनकर स्मृती प्रतिष्ठानची या संदर्भातल्या कार्याची माहितीही त्यांनी दिली तसेच ही लढाऊ परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी मार्गदर्शन केले.तरुण पिढीने समाजासाठी काहीतरी योगदान दिले तर देशात सुस्थिती येईल असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी आपल्या भाषणात अनेक ज्ञात अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याचा उल्लेख केला. त्यांच्या बलिदानामुळेच निजामशाहीतून सुटका होऊन हैद्राबाद प्रदेश स्वतंत्र भारताचा भाग झाला, हे त्यांनी अधोरेखित केले. हैद्राबाद मुक्ती संग्राम हा फक्त इतिहासाचा भाग नाही, तर तो आपल्या स्वाभिमानाचा अध्याय आहे. आज आपण ज्या स्वातंत्र्यात श्वास घेतो, ते हजारो स्वातंत्र्यसैनिकांच्या रक्तामुळे शक्य झाले आहे. त्यांचे बलिदान आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. नव्या पिढीला या संघर्षाची जाणीव करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. त्यांच्या भाषणामुळे कार्यक्रमाला विशेष उर्जा प्राप्त झाली. तसेच आयएमए सचिव डॉ . योगेश लक्कास यांनी आपल्या भाषणातून स्वातंत्र्य संग्रामाच्या घटनांवर प्रकाश टाकला व आजच्या पिढीने या लढ्याची स्मृती जागवावी असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्रसिद्ध चित्रकार श्री.कैलास काळे, ज्येष्ठ चित्रकार श्रीमती संजीवनी डहाळे व शामराव बोधनकर प्रतिष्ठानचे





सचिव व आय एम ए चे पदाधिकारी डॉ राघवेंद्र चाकूरकर* हे मान्यवरही उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर आमंत्रित शाळकरी विद्यार्थ्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्राम या विषयावर चित्रकला सादर केली. त्यांच्या सृजनशीलतेमुळे कार्यक्रम अधिक आकर्षक व प्रेरणादायी झाला. संपूर्ण कार्यक्रम देशभक्तीची भावना जागवणारा, शैक्षणिक व प्रेरणादायी ठरला. हैद्राबाद मुक्ती संग्राम हा आपल्या स्वातंत्र्य लढ्याचा अविभाज्य भाग असून त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची आठवण ठेवणे ही आपली जबाबदारी असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. आभार प्रदर्शन डॉ राघवेंद्र चाकूरकर यांनी केले.

## माझ्या नजरेतील नवदुर्गा



ज्योतिर्मय साहित्य

नवरात्रीनिमिताने प्रत्येक पेपरमध्ये, ''आजची नवदुर्गा, समाजातील नवदुर्गा'' असे सदर चालू आहेत. त्यात मोठ मोठ्या पदावर काम करणाऱ्या आणि उच्चशिक्षित स्त्रियांची माहिती येत आहे. पण फक्त उच्चशिक्षित असलेल्या आणि मोठे काम करणाऱ्या महिलाच नवदुर्गा नसून अगदी छोटे काम करणाऱ्या आणि कमी शिकलेल्या स्त्रिया सुद्धा तेवढ्याच महत्वाच्या आहेत, असे मला वाटते. कारण त्या घरकाम करत असल्या तरी ह्या उच्चशिक्षित महिलांचा मोठा आधार आहेत. त्यांच्या भरवशावर ह्या महिला आपले काम करू शकत आहेत. म्हणून माझ्या मनात आले की, आपल्या अवतीभवती असणाऱ्या आणि आपल्याला मदत करणाऱ्या नवदुर्गा बद्दल का लिहू नये?

ह्या आमच्या मावशी बाई! स्वभावाने शांत, प्रेमळ आणि खूप सकारात्मक! मावशी बाई माझ्या घरी पोळ्या करतात. गड्डम प्लॉट्स अकोला येथे वास्तव्य असलेल्या गंगाबाई भिमराव दूधगम असे त्यांचे पूर्ण नाव आहे. पण सर्वजण प्रेमाने त्यांना अम्मा म्हणतात. अम्माचे वय ७५ वर्ष पूर्ण आहे. त्यांचे यजमान रेल्वेत होते, त्यामुळे अम्माला पेन्शन मिळते. पण तरीही त्या सात घरी दोन वेळेच्या पोळ्या करतात. अम्माची ड्युटी सकाळी सात वाजता सुरु होते, आणि दुपारी बारा वाजता संपते. सायंकाळची ड्युटी सहाला सुरू होते तर रात्री आठ वाजता संपते. अम्माच्या घरी मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. ते तिला सन्मानाने वागवतात. त्याच्याही मागे अम्माची सकारात्मक दृष्टी आणि सालस वागणूक आहे. अम्माने काम करायला पाहिजे असे तिच्याबर अजिबात बंधन नाही. पण तिला रिकामे करमत नाही. अम्माच्या शब्दात सांगायचे झाले तर,

'' मी चार घरी फिरते, माझे पाय मोकळे राहतात. चार लोकांशी संपर्क येतो, चार बायांशी हितगुज करता येते, खळखळून हसता येते, तब्येत चांगली राहते, आणि आलेल्या पैशातून मुलाच्या संसाराला मदत सुद्धा होते.''

अर्चना ठाकरे मोरे
मूर्तिजापुर जिल्हा अकोला

अम्माचे हे शब्द ऐकून तिचा व्यवहारी दृष्टिकोन सिद्ध होतो, आणि मन प्रसन्न होते. नोकरी करणाऱ्या, अगदी बैठे काम असणाऱ्या लोकांचेही आपण वाक्य ऐकतो की, आता पन्नाशी उलटली, रिटायरमेंट जवळ आलं, आता पहिल्यासारखं काम होत नाही. अम्माचे तर रिटायरमेंटचे वय कधीचेच पार झाले आहे. अम्मा स्वतःच्या कामात आजही एवढी तत्पर आहे, की प्रत्येकाकडे ठरलेल्या वेळेत पोहोचते. एखादे वेळी लवकर बोलावले तर तडजोडही करते. प्रवासाला जायचे असले तर अगदी सकाळी सहाला सुद्धा अम्मा आपल्या स्वयंपाक घरात हजर! या वयातला अम्माचा बक्तशीरपणा आणि आनंदाने काम करण्याची वृत्ती पाहिली की, अम्मा बद्दल मन कृतज्ञतेने भरून येते. अशा खूप व्यक्ती आपण दुर्लक्षित करतो पण चांगले शिकलेल्यांनी सुद्धा अम्मा सारख्या कडून शिकले पाहिजे.

म्हणूनच नवरात्रीनिमित्त अम्माच्या कार्याला मनापासून सलाम आणि अम्माला त्रिवार मानाचा मुजरा !

## वास्तुशास्त्र पेंटिंग



लघुलेख-५५

नक्षत्र मालीकेतील १४ वे नक्षत्र 'चित्रा' आहे. या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्तींची जन्म राशी 'कन्या' किंवा 'तुळ' असु शकते. या राशीचा स्वामी अनुक्रमे बुध किंवा शुक्र आहेत. या नक्षत्राचा आराध्य वृक्ष बेल आहे. हा वृक्ष अतिप्राचीन आणि पूर्णपणे पूर्ण भारतीय आहे.

या वृक्षाची पाने 'त्रिदल' म्हणजे तीन पर्णिकांची हिरवीगार व चकचकीत असतात. ही पाने चुरगळल्यास सुगंध येतो. महादेवाला 'बेलपत्र' अतिशय व प्रिय आहे. तीन पर्णिकांचे बेलांचे पान हे "सत्त्व-रज-तम" गुणांचे प्रतिक आहे.

'तुळ' राशीच्या जातकांपैकी काहींचा जन्म चित्रा नक्षत्रावर झालेला असतो तुळ किंवा तुला राशी ही वायु तत्वाची असून या जातका मध्ये न्याय प्रियता दिसते. सुंदर अभिरुचीच्या असतात या व्यक्ती....!! या राशीचा "आराध्य वृक्ष", "बकुळ" हे फुलझाड आहे. या राशीच्या 'पांढरा' आणि 'गुलाबी' रंगांच्या प्रभावावर हे जातक लाभ घेवू शकतात. पुरुषप्रधान ही राशी असल्यामुळे या राशी च्या महीलांमध्ये कांही, पुरुषी गुणांचे संवर्धन झालेले दिसून येते. या नक्षत्राचा पर्यायी वृक्ष 'निर्गुडी' आहे. हा अत्यंत ओषधी व गुणकारी वृक्ष आहे. या नक्षत्राची देवता "त्वष्टा" आहे. चित्रा नक्षत्राचा एकच तारा असतो. त्याची आकृती मोत्या सारखी दिसते. या नक्षत्राचे दोन चरण कन्या राशीत तर दोन चरण तुळ राशीत असतात. 'त्वष्टा' ही देवता, विश्वाची निर्मिती करणारी एक कुशल देवता आहे. इंद्राचे श्रेष्ठ आयुध 'वज्र' हे 'त्वष्टा' या देवतेनेच बनवून दिलेले आहे, भगवान शंकराला यानेच रथ बनवून दिला आहे. गर्भाशयातील गर्भाला आकार देणं, मनुष्य व पशु पक्षांना आकार देणं, सौंदर्य निर्माण करणं, ही या देवतेची मुख्य कार्ये आहेत. "ॐ त्वष्ट्रे नमः" किंवा "ॐ विश्वकर्मण्ये नमः" हे मंत्र, या नक्षत्रावर जिन्मलेल्या जातकांनी केल्यास लाभ होईल.

या राशीच्या व्यक्तींनी "त्वष्टा देवता युक्त" "वास्तुशास्त्र पेंटींग" बनवून वास्तु मध्ये ठेवल्यास 'प्रगती' ची 'गती' अधिक प्रमाणात वाढते, असा अनुभव आहे. प्रकाशन, मुद्रण, लेखन, वित क्षेत्र, इंजिनियरींग, चित्रकला, वकील, रेडीओ, टेलिफोन, स्त्रीरोग तज्ञ, शल्यचिकित्सक अशा क्षेत्रांत खूप मोठी भरभराट होईल.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

---


शिवाराची वाट
ऊन डोईवर आलं
चिंचाच्या सावलीला
जीवा गार वाटलं ||२७५||

शिवाराच्या वाटा
जीत्राबाच लय भेव
कमरेला विळा
मुखी देवाजीचे नाव ||२७६||

---

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## मी कल्हईवाला बनतो...




ज्योतिर्मय साहित्य

तुम्हाला कसा आणि कुठे भेटला ?

अहो, तो दारावर आला होता. त्याच्याकडून माझ्या भांड्यांना कल्हई करून घेतली.

ठीक आहे. तो भेटला तर त्याचा नंबर घ्या. आम्हाला या नंबरवर कळवा. आम्हाला महत्वाचे काम आहे.

असे म्हणून हवालदार साहेबांनी फोन ठेवला. मी मात्र हवालदिल झालो. या महाशयांचे काय काम असावे कल्हईवाल्याकडे ? पोलीस स्टेशनमध्ये कधी तांब्यापितळेची भांडी पाहिल्याचे मला आठवत नाही. म्हटलं जाऊ द्या. आपल्याला काय करायचे ! नाहीतरी अलीकडे सगळ्याच गोष्टींना कल्हई करायची गरज आहे ! अशा प्रामाणिक विचारात रस्ता पार केला. पेपरवाल्याकडे आलो. त्याला म्हटलं, बाबा, अमुक अमुक पेपर आहे का?



आहे ना साहेब.


त्याला पुरवणी आहे का ? ( कधी कधी एखाद्या पेपरमध्ये त्यांचे पुरवणीचे पान टाकायचे राहून जाते )

आहे ना साहेब. त्याने पाहून खात्री केली. मी पैसे दिले, पेपर घेऊन मार्गाला लागलो. रस्त्यात पेपर उलगडून पाहिला. त्यात कल्हईवाल्याच्या छायाचित्रासह माझा लेख आला होता. संपादक महाशयांनी लेखाच्या वर माझे नाव, फोटो छापला होता. लेखाच्या मध्यभागी कल्हईवाला असे ठळक शीर्षक होते. आणि लेखाच्या खाली संपर्कासाठी क्रमांक म्हणून माझा फोन नंबर दिला होता. आता लोकांचा काय गोंधळ झाला असावा याचा उलगडा मला झाला. लेखाच्या खाली दिलेला नंबर कल्हईवाल्याचा समजून त्यांनी मला फोन केला होता.

त्या दिवशी मला असे मोजून सातआठ फोन आले. एकाने तर चक्क विचारले की माझ्याकडे तांब्यापितळेची जुनी भांडी आहेत. ती वितळवून तुम्ही त्याच्या देवांच्या मूर्ती घडवून द्याल का ? त्या दिवशी मला अशा खूप नवनवीन गोष्टी कळल्या. नवीन उलगडा झाला. आपल्या लेखातून मनाला थोडीफार कल्हई करण्याचा आपण प्रयत्न करतो पण ते काही बरोबर नाही. आपल्याला आता प्रत्यक्ष कल्हईवाला होण्याची आवश्यकता आहे असेही वाटून गेले. ज्याची लोकांना गरज आहे असा एक नवीन व्यवसाय गवसला. आता कल्हई शिकून घेण्यासाठी तरी त्या कल्हईवाल्याला भेटणे आवश्यक झाले. तो पुन्हा कधी भेटतो बघू या. यावेळी मात्र मी त्याचा नंबर घ्यायला विसरणार नाही. त्या पोलीस स्टेशनला पण कळवावा लागेल ना !

माझ्या मनात डफलीवाले डफली बजा च्या चालीवर उगाचच एक गाणे आकार घेऊ लागले.

कल्हईवाले, इधर तो आ
सारी दुनिया बुलाती हैं
तेरी कल्हईसे मेरे बर्तनपर क्या रंग आने लगा हैं
चांदी के जैसा बर्तन ये मेरा मुझको लगने लगा हैं
इधर भी आओ, उधर भी जाओ
बुला रहे हैं दुनियावाले...
कल्हईवाले, इधर तो आ..






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मुमुक्षलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार

ओवी क्रमांक २४ च्या पुढे समर्थ मुमुक्षलक्षण पुढील प्रमाणे करतात.

वाचक मित्रांनो हे वाचत असताना प्रत्येकाने आपल्या वागण्याचा, बोलण्याचा विचार करून आपण कुठे आहोत हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे. आणि आपल्यात बदल करायचे आहेत. हे या निमित्ताने नम्रतेने सांगणे आहे.

मुमुक्षलक्षण : जो मनापासून पुण्यमार्ग आचरण्याचे ठरवतो,सत्संगाची इच्छा करतो.आणि संसाराबद्दल विरक्त होतो तो मुमुक्षु होय.


जिथे मोठमोठे चक्रवर्ती राजे आपले राज्य घालवून बसले,त्याच्यापुढे आपले वैभव काहीच नाही असा विवेक ऊत्पन्न होऊन ज्याला सत्संगाची ओढ लागते तो मुमुक्षु होय.

जो स्वतःचे दोष पाहू लागतो आणि वैराग्याच्या शक्तीने जो त्यांना बरोबर जाणतो,मग स्वतः आपणच आपली उद्वेगाने निंदा करू लागतो, तो मुमुक्षु होय.

आपण अगदींच हीन, दीन, नालायक, टाकाऊ आणि पापी आहोत असे मुमुक्षाला खरेंच वाटते. परमार्थ साधनामध्ये जीवाला काही काळ अशा अनुतापाच्या अवस्थेत रहावे लागते. खरं तर त्याने स्वतः ला लावलेली विशेषणें कधीतरी अतिशयोक्त असतात. परंतु अंगी शरणागत् भाव येण्यास ती फार ऊपयोगी पडतात.

मुमुक्षु म्हणतो ‘‘मी तर कोणावरही उपकार न करणारा, दंभाने वागणारा वाईट कामे करणारा असा आहे. मी भ्रष्ट, चांडाळ दुराचारी, दुष्टपापी आहे मी अभक्त, दुर्जन,हीनाहून हीन व जणू काय पाषाण आहे. **(क्रमशः)**

## भवरोगापासून मुक्ततेचा उपाय - सत्संगती व नामस्मरण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

एका गावात एक वैद्य राहात होता. त्या वैद्याला कोणाला काय रोग झाला आहे हे तोंडावरून समजत असे. त्याने एक दिवस एका मनुष्याला आपल्या घरावरून जाताना पाहिले आणि त्याला आत बोलावले. वैद्याने त्या माणसाला सांगितले की, ‘‘तुला एक भारी रोग झाला आहे; पण मी सांगतो ते औषध घे आणि मी सांगेन त्याप्रमाणे पथ्य पाळ, म्हणजे तुझा रोग बरा होईल.’’ वैद्याने सांगितलेले औषध आणि पथ्य त्या मनुष्याने पाळले नसते तर त्यात त्या वैद्याचे काही नुकसान होते का ? त्याप्रमाणेच संतलोक जे आपल्याला करायला सांगतात, त्यात त्यांना स्वत:ला काही मिळवायचे असते का? आपल्याला गुरू सांगत असतात, त्यांचे ऐकल्याने आपलाच फायदा होत असतो. ते आपल्याला भवरोग झाला आहे असे सांगतात आणि त्याकरिता संतसंग करा आणि नामात राहा म्हणून सांगत असतात. ते जे सांगतात ते स्वत: अनुभव घेऊनच सांगत असतात. औषध सोपे असले म्हणून त्यात गुण नाही असे म्हणून कसे चालेल ? तुकारामांनी आपल्या उपासनेची शपथ घेऊन सांगितले आहे की, नामस्मरणासारखे सोपे साधन नाही. तुमचा हल्लीच्या साधूंवर विश्वास नसला तरी समर्थ आणि तुकाराम यांनी सांगितले त्यावर तरी विश्वास ठेवायला काय हरकत आहे ? त्यांनी तुमच्या कल्याणाकरिताच ते साधन सांगितले आहे. ते तुम्ही न कराल तर त्यांचे काही नुकसान नाही, तुमचेच नुकसान आहे; तरी त्याचा विचार करा. आपल्याला रोग झाला आहे अशी आपली अगोदर खात्री झाली पाहिजे, म्हणजे निम्मे काम झाले. आपल्याला रोग झाला आहे असे पक्के कळल्यावर आपण औषध घेण्याचे टाळणार नाही. संसारात सुख नाही असे आपल्याला दिसत असताना, ज्या योगाने सुख मिळेल त्याच्या खटपटीला लागले पाहिजे. त्याकरिता होईल तितके नामात राहण्याचा प्रयत्न करा, म्हणजे तुम्हाला खरे समाधान मिळेल. एका मनुष्याने तीस वर्षे मनापासून नोकरी केली. तो म्हणाला, ‘‘भगवंताची पूजा आणि भक्ती कशी करावी हे मी नोकरीपासून शिकलो.’’ त्याला विचारले, ‘‘ते कसे ?’’ तेव्हा त्याने उत्तर दिले, ‘‘नोकरीमध्ये वरिष्ठांच्या मर्जीप्रमाणे वागावे लागते. तो जिथे बदली करील तिथे आपल्याला जावे लागते; मग घरात अडचण असली तरी तिथे आपले काही चालत नाही. म्हणजे आपलेपण बाजूला ठेवावे लागते. आता मी सेवानिवृत्त झाल्यावर मालक तेवढा बदलला. आता मी वरिष्ठाच्या ठिकाणी भगवंताला ठेवले आहे. भगवंत हा श्रेष्ठ वरिष्ठ आहे, कारण तो माणसासारखा स्वार्थी नाही. तो अत्यंत नि:स्वार्थी असल्यामुळे माझ्या हिताचेच नेहमी घडवून आणतो. म्हणून मी आता अत्यंत आनंदात आहे.’’ याचप्रमाणे प्रत्येक माणसाने आपल्या प्रपंचापासून परमार्थ करायला शिकले पाहिजे. हेच आपल्या जीविताचे सार आहे.अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही; त्यातच भक्ति जन्म पावते.




## रक्ताभिसरण संस्थेचे शुद्धीकरण गरजेचे आहे, कारण...

ज्योतिर्मय साहित्य

१) जेवणाच्या लगेच आधी, जेवतांना मध्ये-मध्ये आणि जेवणानंतर लगेच पाणी प्यायचे नाही. कारण त्यामुळे जठराग्नी विझते, पाचक रस पातळ होतात त्यामुळे खाल्लेले अन्न पचत नाही. त्यामुळे जेवणाच्या किमान आर्धा तास आधी आणि जेवणानंतर एका तासानेच पाणी प्यावे.

२) पुरेसे आणि शिस्तबद्ध पद्धतीने पाणी प्यावे - पुरेसे म्हणजे २० किलो वजनाला १ लिटर पाणी लागते म्हणजेच ६० किलो वजन असेल तर ३ लिटर पाणी आवश्यक आहे, अती नको वा कमीही नको. शिस्तबद्ध पद्धतीने म्हणजे पाणी नेहमी बसून प्यावं, उभं राहून पिऊ नये. पाणी नेहमी ग्लास तोंडाला लावून प्यावं, वरुन पिऊ नये. आणि महत्वाचं म्हणजे पाणी चावून खावे म्हणजे गटागट न पिता जास्तीत जास्त लाळ मिसळून सावकाश पिलं पाहिजे कारण लाळ अल्कलाईन (क्षारीय) असते, ती दर मिनिटाला साधारण ०.५ बनत असते, ती जास्तीत जास्त पाण्यासोबत पोटात जाणे गरजेचे असते. कारण त्यामुळे पोटातील ॲसिडीक वातावरण नॉर्मल (सामान्य) व्हायला मदत होते आणि पोटातील ॲसिडीक वातावरण जेवढं नॉर्मल (सामान्य) होईल तेवढं वात-पित्त-कफ संतुलित राहून आपण निरोगी राहतो.

पाणी पुरेसे आणि शिस्तबद्ध पिण्यात आलं तरच किडनी ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते.

३) जागरण टाळणे - रात्री १० च्या आत झोपलंच पाहिजे. कारण रात्री १० च्या आत झोपलं तरच आपण रात्री ११ ते ३ या वेळेत गाढ झोपेत असू आणि या वेळेत गाढ झोपेत असलो तरच यकृत () ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते, अन्यथा शरीरशुद्धी व्यवस्थित होत नाही.

४) सुर्यास्तानंतर शक्य तितके लवकर जेवावे - सुर्यास्तानंतर आपली जठराग्नी शांत व्हायला लागते. त्यामुळे सुर्यास्तानंतर शक्य तितक्या लवकर जेवावे. खरं तर सुर्यास्तानंतर काहीच खाल्लं नाही पाहिजे. पण आपल्या लोकांचा स्वयंपाक लवकर होत नसल्याने सुर्यास्तानंतर किमान शक्य तितक्या लवकर तरी जेवावे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५) रात्री जेवलं की लगेच झोपणं टाळावे - जेवलं की लगेच झोपलं तर खाल्लेले पचत नाही आणि न पचलेलं सडून विषारी द्रव्ये (टोक्सिन्स) तयार होतात. त्यामुळे रात्रीचं जेवण आणि झोपणं यामध्ये २-३ तासांचे अंतर अवश्य असावे.

६) ताण-तणाव (स्ट्रेस) टाळावा - ताण-तणावांमुळे शरीरात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात. त्यामुळे ताण-तणाव नियंत्रित राहण्यासाठी नियमितपणे व्यायाम व ध्यान (मेडिटेशन) करावे.

७) विरुद्ध आहार टाळावा - विरुद्ध आहार शक्यतो दूध-दही याबाबतीत घडतो. जेवतांना दूधाची खिर खाऊ नये किंवा जेवणानंतर लगेच दूध पिऊ नये. कारण दूधात मीठ टाकलं तर दूध नासते, मग जेवणात मीठ असतेच त्यामुळे जेवतांना किंवा जेवणानंतर लगेच दूध पिलं तर दूध नासण्याची प्रक्रिया पोटात चालू होते आणि त्यामुळे पोटात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात म्हणून याला विरुद्ध आहार म्हणतात.

तसेच दही रात्री खाणंही विरुद्ध आहार आहे कारण दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) आपल्या शरीरात दुपारीच बनत असतात त्यामुळे दही दुपारीच खावे. रात्री दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) बनत नसल्यामुळे रात्री दही पचत नाही उलट सडून विषारी द्रव्ये तयार होतात त्यामुळे याला विरुद्ध आहार मानलं जातं.

॥ संत महात्म्य ॥
लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

ज्योतिर्मय साहित्य

असे सदबुद्धी असलेले सिद्ध पुरुष अनेको अनेक निर्माण व्हावेत. त्यांच्या प्रभावातून दृष्टांचा दुष्टपणा कमी व्हावा सर्व भूतमात्रात परस्परात स्नेह निर्माण व्हावा. ही मंगल कामना आणि तशी आग्रही मागणी भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी आपली अनंत जन्माची तपसाधनेचे तेज पणाला लावून हे पसायदान मागून घेतलेले आहे. असे सुबुद्धी असलेले म्हणजेच बुद्धी योगी सिद्धपुरुष निर्माण होण्यासाठी त्यांना सिद्ध करून घेणारे, समर्थ सद्गुरु तितक्याच मोठ्या प्रमाणावर लागणार आहेत, म्हणून भगवंताला त्यांनी अशा सिद्ध पुरुषांचे जथेच्या जथे लोककल्याणासाठी आणि बुद्धी योगी सिद्ध पुरुष घडविण्यासाठी जनसामान्यात पाठवावेत ही आग्रहाची विनंती केली आहे. आणि तसा आदेश या महारावानी म्हणजेच ज्ञानेश्वर महाराजांनी इतर सिद्धांना दिला आहे. असे सिद्ध पुरुष निर्माण झाल्यानंतर त्यांच्या प्रभावाने राग द्वेष मोह अभिनिवेष हे क्लेश क्षिण होतील. आणि समाज सत्वगुण प्रधान व्हायला मदत होईल. म्हणजेच पर्यायाने या समाजाचे अध:पतनापासून रक्षण होईल.

आता आपणास कळाले असेल की ज्ञानेश्वर महाराज यांनी ही ज्ञानेश्वरी या जगताचे अध्यपतनापासून कसे रक्षण करील याचा वस्तू पाठ या ग्रंथातून दिला आहे.यात अनेक दिव्य प्रयोग दिले आहेत. साधकांनी ते प्रयोग स्वतःची पात्रता वाढवून आणि श्री गुरुच्या कृपेने मिळवायचे असतात. आणि पूर्णत्वास न्यायचे असतात.

अशा रीतीने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निश्चितच या कलि युगाला अध:पतनापासून वाचविणारा महान ठेवा आहे. यात किंचितही शंका नाही.

सिद्ध पुरुषांचे सामर्थ्य कसे असते हे जाणण्यासाठी नुकतेच आळंदी येथे केलेला एक प्रयोग लक्षात घेण्यासारखा आहे.

काही लोकांना असे अनुभवास आले की ज्ञानेश्वर माऊलीची समाधी असणाऱ्या आळंदीच्या परिसरात कितीही लोक येवोत त्यांच्यात सद्भाव, भक्ती जागृत होते. विकारांना थोडासा लगाम लागतो. हे याच क्षेत्रात आल्यावर कसे काय घडते ?हा प्रश्न पडला. काही लोकांनी वैज्ञानिक प्रयोग करून पहावे म्हणून अल्फा रेज चा संदेश टिपणारे उपकरण आणले आणि त्यांच्या हे लक्षात आले की, माऊली च्या समाधी स्थानापासून दहा किलोमीटर वर हवेत आणि २२ किलोमीटर रुंद परिसरात सर्वत्र अल्फा रे चा प्रभाव दिसून आला.

समाधी अवस्थेत जेव्हा योगी असतो ,तेव्हा ही दिव्य किरणे त्याच्या मस्तकातून बाहेर प्रस्फुटीत होत असतात,

आणि त्यांच्या संपर्कात जो कोणी येईल, त्याचा रजो गुण आणि तमोगुण कमी होऊन, सत्वगुण प्रभावशाली होऊ लागतो.

माऊली समाधीस्थ होऊन आज साडेसातशे वर्षे झाली. आजही इतक्या प्रचंड प्रमाणात अल्फा रे चा वर्षाव समाधी स्थानातून बाहेर पडतो आहे. तर ज्यावेळेस माऊली प्रत्यक्ष देहानीशी हजर होते, त्यावेळेस त्यांचा प्रभाव किती दूरपर्यंत जात असेल?ज्ञानेश्वरीत दिलेले दिव्य प्रयोग हे गुरूच्या मुखातून त्यांच्या आज्ञेने प्रत्येकाने कसोशीने करावेत व स्वतः विकसित होण्या सोबतच अवती भवतीचा संपूर्ण परिसर सत्व गुण प्रधान करून या देशाला सुजलाम सुफलाम करण्याकडे वळावे ही इच्छा व्यक्त करून हा भाग इथेच संपवितो.

****



## ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

याचये वरमेकं हि विस्मरणं तु मा भवेत्।
सदा स्मरानि ते नाम शिशुं पालय तारय।।८३।।

मी एकच वर मागतो. विस्मरण होवू नये. तुझे नाम सदैव स्मरावे. आपल्या लेकराचे पालन व रक्षण कर.

त्वमेव प्रार्थये नित्यं नाम स्मरामि ते सदा।
यत्र कुत्रापि सर्वत्र हासं पालय तारय।।८४।।

नित्य तुलाच प्रार्थना करतो. तुझे नाम सदैव स्मरतो. जेथे कोठे सर्वत्र हासाचे पालन कर. रक्षण कर.

अथ संकटनाशनार्थं चण्डिकास्तोत्रम्।
घघोरघोरविघ्नाद्धि मां रक्ष रक्ष चण्डिके।
भयानकं हि सर्वं तद् त्वमस्यभयदायिनी।।८५।।

हे चंडिके, भयंकर अशा विघ्नापासून तू माझे संरक्षण कर. ते सर्व भयानक आहे. तूच अभयदायिनी आहेस.

कुलस्य स्वामिनी मातः श्रीजमदग्निभामिनी।
रेणुराजसुते विश्वाम्बे परशुराममातृके।।८६।।

हे परशुरामजननी, रेणुराजकन्ये, जगदंबे, माते, तू कुलस्वामिनी आहेस.श्रीजमदग्नीऋषींची भार्या आहेस.

दयां कृपां कुरूश्व त्वं त्वया विना न तारणम्।
त्वदीयाय प्रसादाय सदाशिवे स्पृहाम्यहम्।।८७।।

हे सदाशिवे, तू दया कर. कृपा कर. तुझ्या विना कोणी तारणारे नाही. मी तुझ्याच प्रसादाची इच्छा करतो.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

ती नको म्हणाली.रावण म्हणे तू पतिव्रता आहेस ना ?पतीच्या मताला विरोध तू करू नये.प्रतिकुलतेतून अनुकूलता कसे घ्यावे हे आपणास कळावे.देव दुसऱ्यास दुःख देत नाही.परिपूर्ण सुख म्हणजे परमात्मा आहे तर त्या पासून दुःख कसे देईल.

*प्रपंचातील असणारी प्रतिकुलता ही पारमार्थिक अनुकूलता असते.* तुम्हाला या स्थितीत भगवंत चरणी अनन्यता यावी या साठी ही स्थिती असते.समजा आपणास कळाले आपण आजाराने केवळ एकच दिवस जगू शकणार आहोत. असे कळाले तरी भगवंताची कृपा समजावी ,कारण इतक्या कमी वेळेत माणूस किती आर्ततेने भजन करू शकेल.एरवी असे भजन घडण्यास जीवन संपेल पण होणार नाही.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

रावणाने मंदोदरी हिला सीतेला समजाविण्या साठी पाठविले. पण उपयोग झाला नाही.

मंदोदरीने असा विचार केला.या निमित्ताने सीतेला भेटता येईल. तिच्या बरोबर चर्चा करता येईल. तिचा कडून रामाचे स्वरूप संबंधी आपणास विचार करता येईल. सीतेच्या दर्शना नंतर मंदोदरीला कृत कृत्य वाटले.बस आता काही जाणून घेण्याचे उरले नाही. सीतेने मंदोदरीला विचारले तुम्ही इथे कशा साठी आलात? मंदोदरी अतिशय हुशार आहे. तिला परस्पर विरोधी दोन गोष्टी तिला विचारायच्या होत्या.

**(क्रमशः)**

# निःसंग स्वरूप : शब्दांचा सुद्धा संग्रह नको....

**ज्योतिर्मय साहित्य**

श्रमण धर्मातील भगवंत अपरिग्रही होते. कुठलाही संग्रह त्यांना स्पर्श करू शकत नव्हता. ज्यांनी राज्य, सर्व वैभव, आप्त, स्वकीय आणि सर्व प्रकारचे इंद्रिय सुख, भोगोपभोग अशा सर्वस्वाचा त्याग केलेला होता. या श्रेणीतील कोणत्याही देवाने, भगवंताने, सर्वज्ञता प्राप्त महानुभावाने कधीही कोणतेही शास्त्र स्वतः हाताने लिहिली नाहीत, किंवा इतर आचार्य ऋषी महर्षी यांनी लिहिलेली शास्त्र स्वतःकडे जमा ठेवली नाहीत.

होय! शब्द जड़ आणि भौतिकच

असे वीतरागी, सर्वज्ञ, कैवल्य प्राप्त भगवंत शब्दांच्या संग्रहाला सुद्धा परिग्रह मानायचे असे म्हणता येईल. शब्द हे सुद्धा जड़ आहेत, शब्द भौतिक आहेत. भौतिक वस्तूच आपल्या पंचेंद्रिया द्वारा गम्य असतात. या विश्वामध्ये बाह्य कर्ण इंद्रिय द्वारा अवलंबित आणि बाह्य कर्ण इंद्रियाच्या आतील भावेंद्रिय द्वारा जाणण्यायोग्य असा ध्वनी म्हणजे शब्द होय. भौतिक पदार्थाचे लहानात लहान अतिसूक्ष्म कण अणु परमाणु यांच्या परस्पर घर्षण आणि आघाताने शब्दांची उत्पत्ती आणि निर्मिती होत असते. म्हणून शब्द हा जड़ भौतिक पदार्थातील अणु परमाणूंची संयुक्त अवस्था आहे. अणु परमाणु परस्पर स्पर्शीत झाले असता शब्द उत्पन्न होतो. सूक्ष्म अणु-परमाणूंच्या स्वरूपामध्ये , ध्वनी लहरींच्या रूपात शब्द उत्पन्न होत असतात.

शब्दांची उत्पत्ती भौतिक प्रक्रियाच

शब्दांची उत्पत्ती जीव आणि अजीव या दोन्हींच्या द्वारा होत असते. अजीवांच्याच्याद्वारे परस्पर स्पर्श आघात व खंडणातून देखील शब्दांची उत्पत्ती होते, जसे वीणा वगैरे त्यात निमित्त बनतात. जीव स्वतः भाषात्मक शब्द उत्पन्न करतो. भाषात्मक शब्द दोन प्रकारचा असतो. अक्षरात्मक आणि अनक्षरात्मक. विकसित जीव जाती भाषात्मक शब्द उत्पन्न करतात. तो ऐकून त्याचा अर्थ लावला जाऊ शकतो म्हणून तो अक्षरात्मक. स्पर्श आणि रसना हे दोन इंद्रिय असलेले अविकसित जीव जो शब्द निर्माण करतात तो ही अनक्षरात्मक असतो. पृथ्वी व आकाशाच्या ज्या भागामध्ये भौतिक द्रव्य विद्यमान असतात, ते द्रव्य अर्थातअणू परमाणूंच्या स्वरूपात असतात. अणु परमाणूंच्या संयुक्त जातीला वर्गणा असे म्हणतात.




भौतिक सूक्ष्म द्रव्याचे हे विशिष्ट कार्यकारण निमित्त भाव रुपात्मक बनणारे घटक असतात. त्यातच भाषावर्गणा नामक अणु परमाणूंचा एक समूह असतो. जीवाच्या अपेक्षेनुसार व अजीव जडद्रव्यांच्या परस्पर आघात खंडणा नुसार ते आकर्षित होऊन कार्यरूपात व्यक्त उत्पन्न होतात. हेच शब्द.

शब्द स्वतःचे अस्तित्व अबाधित ठेवून परिभ्रमण करतात. या सर्व विश्लेषणावरून शब्द हे भौतिक जड़ स्वरूपाचे असतात हे सिद्ध होते. भौतिकतेचा संचय संग्रह म्हणजेच परिग्रह, आणि तो एक दोष आहे. संग्रहाची व्यवस्था करावी लागते. त्या व्यवस्थेसाठी पुन्हा अन्य परिग्रह उत्पन्न होतो. त्याच्या संरक्षणासाठी आणि व्यवस्थेमध्ये बऱ्याचदा वाद, विवाद संघर्ष होतात. एकाने केलेला अति संग्रह इतरांच्या विपन्नतेचे कारण बनतो. म्हणून परिग्रह संग्रह या मुळे हिंसा घटित होते. कोणताही भौतिक संग्रह जीवात्म्यास मुक्ती पासून दूर नेतो. संग्रहाने संसार वाढतो.

शब्द : अल्पज्ञांचे माध्यम

यासाठी भगवंतांनी शास्त्र लिहिले नाहीत. कोणी देवाने स्वतः शास्त्र निर्मिती करून शब्दांचा संग्रह केला नाही. अखेर सामान्य आणि अल्पज्ञानी व्यक्तींना तत्व, सत्य समजण्याचे माध्यम शब्द आणि त्याच्या उच्चारात उत्पन्न स्वर हेच आहे,म्हणून ते आवश्यक बनते. केवळ मात्र संसारातील कैवल्य किंवा संपूर्ण ज्ञान प्राप्त न झालेल्या जीवांसाठीच हे शब्दांचे माध्यम असते. जीवांचे व्यवहार शब्दाविना होत नाहीत. भले ही ते शब्द व्यक्त असोत वा अव्यक्त.

दिव्यध्वनी अनक्षरात्मक असते

म्हणूनच ज्यावेळी संपूर्ण कर्मांना सोडून, कर्मांचा नाश करून,समस्त भौतिकता झटकून जीवात्म्याला सर्वोत्कृष्ट, सर्वोत्तम उज्वल, शुद्ध स्वरूपात, स्थायित्व भावात, शाश्वत स्वरूपात स्थिर व्हायचे असते त्यावेळी हे शब्द आणि भाषा सुद्धा झटकून गळून पडतात. यासाठीच त्या वेळेची अपेक्षा असते - शब्दांचा संग्रह नको. विचारांचा दुराग्रह नको. म्हणूनच कैवल्य प्राप्त भगवंत दिव्य ध्वनी द्वारे उपदेश करत असतात. ही दिव्य ध्वनी अनक्षरात्मक असते. म्हणूनच दिव्य. अर्थात ही दिव्य ध्वनी प्रस्फुटीत होत असताना सर्व दिशेने भगवंताचे मुखदर्शन होते, त्यांचे ओठ न हलता ती भाषा एकाच वेळी सर्व जीवांपर्यंत त्यांना समजेल अशा स्वरूपात पोहोचते आणि त्यांना अर्थानुभूती होते. यात शब्द संग्रह, शब्दांचा सुद्धा परिग्रह कुठेच येत नाही.

शब्द अर्थात् भौतिक संग नको

लेशमात्र यत्किंचित परिग्रह देखील संसार परिभ्रमणाचे कारण बनतो. कैवल्य,सर्वज्ञता प्राप्त महानुभाव यांच्या आणि मुक्तीच्या मध्ये अखेर शरीर उरलेले असते. निःसंग अर्थात् काहीच संग म्हणजेच सोबत नको. त्यात भौतिक शब्दांचा संग्रह देखील कशासाठी?

संग्रह किंवा परिग्रह दोन प्रकारचा सांगितला आहे.अंतरंग परिग्रह आणि बाह्य परिग्रह. या ठिकाणी विचार व त्या विचारातील विषयांची आसक्ती हा अंतरंग परिग्रह आणि शब्द हा बाह्य. कारण व्यक्त होण्यासाठी विचार शब्दांच्या स्वरूपात येतात. आणि शब्दाला व्यक्त होण्यासाठी इंद्रियांचे सहाय्य लागते. स्वरयंत्र,ओठ, दंत, जिव्हा यांच्या सहकार्याशिवाय जीवांचे शब्द अस्तित्वात येत नाहीत. म्हणूनच ते भौतिक आहेत.

संपूर्ण अंतरंग आणि बाह्यपरिग्रहाच्या त्यागा शिवाय वीतराग, सर्वज्ञ अवस्थेला कोणीही प्राप्त होऊ शकत नाही. अर्थातच राग द्वेष शुन्य वीतराग अवस्था. राग द्वेषाच्या अभिव्यक्तीचे साधन सुद्धा विचार आणि शब्द हेच आहे. म्हणूनच सर्वज्ञांचे असे भौतिक साधन नसतात. आणि त्यांचा अभिप्राय, आचरणाचा भाग हाच असतो की शब्दांचा सुद्धा संग आणि परिग्रह, संग्रह नको.

# ओळखलत का सर मला ?

**ज्योतिर्मय साहित्य**

पावसात आले कोणी
कपडे होते कर्दमलेले
केसांवरती पाणी

सध्या महाराष्ट्रात प्रचंड पाऊस झाला आहे. अजूनही होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

मराठवाड्यात, पश्चिम महाराष्ट्रात तर अतिशय बिकट परिस्थिती ओढवली आहे. जवळ जवळ सर्वच जिल्ह्यातील खेडोपाडी शेतात गुडघ्या पेक्षा जास्त पाणी आणि चिखल झाला आहे. बळीराजाने केलेले कष्ट, पेरलेले बीज, केलेली मशागत, पिके, लावलेले पैसे, सारी काही अवघ्या काही तासात पाण्यात गेले आहे. हे बळीराजा सध्या अनुभवत आहे. टीव्हीवर बातम्यात हे पाहताना प्रेक्षकाच्या डोळ्यात ही पाणी येते आहे. काय देवा हे ? एवढा निष्ठुर का झालास?


गिरीश वसेकर ( देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००

सध्याच्या परिस्थितीवरून मला कुसुमाग्रजांच्या एका लोकप्रिय कवितेची आठवण झाली ती कविता म्हणजे कणा. कणा ओळखलंत का सर मला? पावसात आला कोणी कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून गंगामाई पाहुणी आली गेली घरट्यात राहून माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतींत नाचली मोकळ्या हाती जाईल कशी बायको मात्र वाचली भिंत खचली, चूल विझली होते नव्हते गेले प्रसाद म्हणुन पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे चिखलगाळ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे

खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
पैसे नकोत सर जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा!

ही कविता वाचली की आजची बळीराजाची परिस्थिती पुन्हा समोर येते. अशीच परिस्थिती महाराष्ट्रातील बऱ्याच कुटुंबाची झाली आहे. कुसुमाग्रजाकडे आलेल्या त्या व्यक्तीच्या अंगावर,केसांवर पाणी, चिखल होता.

तो म्हणाला, सर माझ्या घरट्यात गंगामाई पाहुणी म्हणून आली होती, घरट्यात राहून गेली. माहेरी आलेल्या एखाद्या मुलीसारखी नाचली

आणि निघून गेली पण जाताना मोकळ्या हाताने

नाही कशी जाईल? भिंत खचली, चूल विझली,


होतं नव्हतं ते सगळं गेलं आणि प्रसाद म्हणून पापण्या मध्ये पाणी ठेवून गेली.

बायकोला घेऊन आता घरातील चिखल गाळ काढतो आहे,पडकी भिंत बांधतो आहे

एवढं ऐकल्यावर कवीचे मन दाटून आले, त्यांचा त्या व्यक्तीला पैसे देण्यासाठी खिशाकडे हात जाताच ती व्यक्ती म्हणाली सर पैसे नकोत मला, फक्त एकटेपणा वाटला मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा.


सारं काही गेल्यानंतर पुन्हा नव्याने उभं टाकायचं किती सुंदर हे धारिष्ट. याच परिस्थितीत कुणी तरी धीर देणारा हवा असतो, एखादा पाठीवर हात ठेवणारा हवा असतो, तो सध्याचा हात म्हणजे

सरकारचा आहे. सरकार आपल्या परीने प्रयत्न करते आहे पण महाराष्टातील सध्याच्या निसर्गाच्या माऱ्याने पीडित बळीराजाला सरकारच्या सर्व सुविधा त्वरीत मिळाव्यात व हा बळीराजा पुन्हा नव्याने लवकरात लवकर उभा रहावा हीच ईश्वरचरणी प्रार्थना










# आपले सण.. आपले उत्सव...

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

कृष्ण जन्मानंतर कृष्ण पाळणा ऐकून म्हणून, सुंठवडाप्रसाद घेऊन तृप्त होत असू. खूप आनंद प्रसन्न भक्ती भावाने हे सण साजरे होत असत. दुसर्या दिवशी गोपाळ काला, दहीहंडी नाक्या नाक्यावर बांधलेल्या झाड, खांब इमारती जमेल तेवढ्या उंच बांधलेल्या असायच्या. घरोघरी जाऊन आई तुझी घागर रिकामी गे,

आरोळ्या ठोकत पाण्याच्या बालद्या डोक्यावर रिकाम्या करत, आरडा ओरडा करत मुले धमाल करायची. लहान मोठी मुले, पुरुष खूप हिरिरीने भाग घ्यायचे, चढणे, पडणे हंडी फोडणे खूप च धमाल दहिकाल्याची, मग तो प्रसाद, समुद्रावर मुले, पुरुषमंडळी पालखीसोबत जायची. याच महिन्यात स्त्रियांचा आवडता सण मंगळागौर असतो, सर्व सख्या, घरातील नातेवाईक व ओळखीच्या बायका एकत्र मिळून खूप उत्साहात मंगळागौरीच्या पूजा व सर्व स्त्रियांचे पूर्वीच्या काळचे खेळ व सालंकृत नऊवारी साडीत हे खेळ खेळून आपला आनंद व भक्ती द्विगुणित करतात.

याच महिन्यात पिठोरी अमावस्या येते, मग पुन्हा घरातले सर्व दिवे माती, तांबे, पितळ, चांदी सर्व स्वच्छ लखलखीत करुन, दिव्यांची यथोचित पूजा करायची मोठ्या पायाखाली रांगोळी काढून स्वच्छ धुतलेल्या नवीन मोठ्या पाटावर कुंकुम रेखून दिव्यांची पूजा करायची.

देव्हार् याच्या बाजूला चौसष्ट योगिनींची तस्वीर लावून जिवती ची पिठोरी मातेची यथासांग पूजा, मुलाबाळांच्या रक्षणासाठी आई मनोभावे सर्व करायची.

ते सर्व दिवे एकाच वेळी लावले जायचे त्या दिव्य प्रकाशात आईच्या चेहर्यावर चे सोज्वळ तेज अजूनही नजरेसमोर येते.

रांगोळ्या, फुलांची सजावट
सुग्रास घरगुती पंचपक्वान्नाचा
नैवैद्य, धूप ,दीप, पूजा, आरती
ते सारे सणासुदीच्या प्रसंग अजूनही आठवतात.
सरे श्रावण आता भादव्याची आठवण,
येणार बाप्पा, स्वागतासाठी सजवू प्रांगण.

भाद्रपदाच्या पावसातच श्रीगणेशाचे आगमन होणार असते, त्याआधी हरितालिकेचे व्रत असते, कुमारिका सुयोग्य पतीच्या प्राप्तीसाठी, आणि सुवासिनी पतीच्या निरोगी दीर्घायुष्य व जन्मोजन्मी हाच पती मिळावा यासाठी खूप कडक असा निर्जली उपवास करतात, हरितालिका पार्वती ची मनोभावे पूजा करतात, हे सर्व करतांना स्त्रिया घरातील सर्व कामे उरकून सालंकृत वस्त्राभूषणाने, तयार होऊन मनोभावे पूजा करतात.

दुसर्या दिवशी

कलाबुद्धिचे दैवत गणपतीबाप्पा येणार असतात, त्याआधी सर्व तयारी व्यवस्थित व्हायला हवी म्हणून घरातील सर्व लहानथोर मंडळी आपल्याला जमतील ती कामे करुन रात्रभर जागरण करतात. आरास करण्याचे काम तर पहाटेपर्यंत चालूच असते, पूजा, नैवैद्य आरास घरातील मंडळी खूपच अगत्याने हे करत असतातच, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे ही मोठ्या उत्साहाने श्री गणेशाच्या स्वागतासाठी तत्पर असतात, देवाची गाणी, आरत्या सर्व खूप छान तयारी चालू असते. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव चालू केल्यापासून दरवर्षी गणेशोत्सवाचे महत्त्व आणि माहात्म्य वाढतच गेले आहे. सर्व कुटुंबातील, किंवा आजूबाजूची माणसेही गणेशोत्सवाची आनंदाने वाट पहात असतात. सर्व प्रिय असा सुखकर्ता, दुः खहर्ता श्री गणपती बाप्पा आपल्या घरी कधी येतोय याची वाट पहात असतात, श्री गणेश चतुर्थीला वाजत गाजत गणपती बाप्पा जेंव्हा प्राणप्रतिष्ठा पूर्वक आपल्या आसनावर स्थानापन्न होतात, तेव्हा सर्व भाविकांच्या मनावरचा दडपण उतरते. खूप उत्साहाने भक्ती पूर्वक श्रींची पूजा केली जाते. सुंदर सजावटीत अगदी आनंदाने, प्रेमाने विराजमान झालेले गणपती बाप्पा पाहून प्रत्येकाच्या हृदयात एक


स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

भक्तीपूर्ण विश्वास दाटून येतो, हा प्रेमाचा, भावनेचा गहिवर, त्यातून ओसंडून वाहणारी अपार भक्ती आणि आधार याचा दुवा साधला जातो.

प्रसन्न मंगलमय वातावरण, सुगंधी, सुर्य भक्ती पूर्वक वातावरणात प्रत्येकाची भक्ती आणि विश्वास जागृत होतो.

सामुदायिक रित्या होणार्या सण आणि उत्सवामध्ये सांस्कृतिक, धार्मिक, अध्यात्मिक विकास नक्की च होतो. गणेशोत्सवाच्या दिवसातच गौरीचे आगमन होते. प्रेम, भक्तीभावाने माहेरवाशीण गौरीचे स्वागत पूजाअर्चा



नैवैद्य

जागरण होते, देवीचा आशीर्वाद घेतला जातो, सर्व च समारंभात देवांची यथोचित पूजाअर्चा केली जाते. मांगल्याचे तेज आणि प्रसन्न उत्साही वातावरण असते. एक दिव्य अनुभूती मिळते. दीड दिवस, पाच, सात, गौरीगणपती विसर्जना नंतर

अनंत चतुर्दशी च्या दिवशी सार्वजनिक गणेश विसर्जन चा मोठा सोहळा असतो. गणेशोत्सवाच्या सर्व दिवसात आनंद, मांगल्य, आपुलकी, भक्ती सर्व च सकारात्मक गोष्टी पहायला मिळतात.

त्यानंतर पितृपक्ष चालू होतो. आपल्या पितरांचे ऋण फेडण्याचा काळ, म्हणजेच त्यांचा भेटण्याचा काळ या पंधरा दिवसात आपल्याला सोडून जी माणसे या जगात आपल्याबरोबर नाहीत ती या पंधरा दिवसात आपल्याला भेटावयास काकरुपात येतात.

त्यावेळी त्या तिथी आणि ते सर्व पिंडदान वगैरे करावयाचे असते . पितृपक्षानंतर

शारदीय नवरात्र

नऊ दिवस नवरात्रीचा गजर, जागर देवी आदिशक्ती, नऊ दिवस नऊ रुपात पृथ्वी तलवार अवतरते ती नऊ दिवस महिषासुराशी युद्ध करणारी महिषासुरमर्दिनी दहाव्या दिवशी ते युद्ध संपते, दुष्ट शक्ती चा नाश करुन अंबामाता विजयी होते. नऊही

रात्रंदिवस देवीचा जागर चालू असतो, अनेक ठिकाणी सार्वजनिक नवरात्रोत्सव चालू असतो. अनेकांच्या घरी अंबा मातेच्या स्वरुपात घट बसविले जातात. खूप मोठ्या भक्ती भावाने पूजा, आरत्या, गोंधळ, भोंडला, गरबा वगैरे कार्यक्रम होतात, भक्ती रसात न्हाऊन देवीची स्तुती गीते म्हटली जातात, भक्तीमय वातावरणात, उत्साहात नवरात्रोत्सव साजरा होतो. विजय पताका लावणारा दसरा, दशमुखी रावणाचा वध,

आपट्याच्या झाडावरील लपवलेली शस्त्रे बाहेर काढण्याचा शस्त्रे पूजण्याचा दिवस, एकंदरीत विजय पताका लावण्याचा, साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा दिवस. हा दिवसही मोठ्या आनंदोत्सव म्हणून साजरा केला जातो.

काही दिवसातच सर्वांचा आवडता मोठ्ठा सण दिवाळी चोहोबाजूंनी आनंदाची खैरात घेऊन येणारा लक्ष लक्ष दीपांनी घरे उजळविणारा आनंदोत्सव येतो.

सडे संमार्जन, वैविध्यरंगावली
आकाशदीप झुले वरी,
लक्षलक्ष दीप दारी
रंग सजावट, लखलखाट
धूप दीप, आरती
सुगंध, सुग्रास, पंच पक्वान्ने
बनती घरोघरी
पै पाहुणे येती जाती
प्रेमाच्या भेटीगाठी
अशी दिवाळी करु साजरी
वसुबारस, धनत्रयोदशी
नरकचतुर्दशी, लक्ष्मी पूजन
बलिप्रतिपदा,भाऊबीज
तुळशी विवाह , देव दिवाळी
सारे उत्साह आनंदाचे उधाण
आतषबाजी रोषणाईउधळण
चला करु सणांचा जागर
मार्गशीर्षात येती दत्त दिगंबर
वैभव लक्ष्मी व्रत गुरुवार
मिळेल सारे भक्ती सार.
पौषमासी तीळगूळ वाटू या
गोड बोलून, सुगडी पुजुनि
सौभाग्य वाण देती सुवासिनी
शाकंभरी पौर्णिमा व्रत करुनि
पुत्रदाएकादशी महत्त्व जाणुनि.
माघ मासी येती बाप्पागणपती
वसंतपंचमोत्सव सरता लगोलग
रथसप्तमी सूर्यदेव रथावर येती
जयाएकादश्ी पूजेची लगबग.
फाल्गुन मासी महाशिवरात्री
होलिकोत्सव पौर्णिमेच्या रात्री
मराठी महिन्यांच्या बारा मासी
सण उत्सवाचे महत्त्व जाणावे
सकल जनांनी आनंदी व्हावे
एकत्र येऊनि महात्म्य वाढवावे
भक्तीरसात न्हाऊन निघावे.

अशा रितीने आपल्या जीवनात सणांचे अतुलनीय महत्त्वाचे स्थान आहे. हे केवळ

सण, किंवा अंधश्रद्धा म्हणून याकडे पाहू नये. तर

प्रत्येक सणांमागे शास्त्रोक्त आधारआहे, कौटुंबिक, मानसिक, सामाजिक एकत्रीकरणाचा आधार आहे.

अध्यात्मिक शुद्धीकरणाचा नवचैतन्य जागृतीची जाणीव आहे. संस्कृती आणि परंपरेचा अविभाज्य घटक आहे.

अध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक कारणांनी जेंव्हा काही महत्वाचे दिवस साजरे होतात त्यांना सण म्हणतात.


आपली संस्कृती, परंपरा जपायची असेल तर अशा अध्यात्मिक कारणांनी एकत्र येऊन त्याचे पारंपरिक नियमन केले जाते.

आपली संस्कृती जपण्यासाठी सणांचे महत्त्व जाणून घेतले पाहिजे. ऋतूंमध्ये जसजसे बदल होत जातात तसतसे निसर्गामध्ये वातावरणात बदल होत जातात. खूप पूर्वी पासून ऋषीमुनींनी खगोलीय अभ्यासक्रमानुसार क्षण, प्रहर, वेळ, काळ तिथी, ग्रहगोल, तारे , आकाशगंगा यांचा अभ्यास करून पंचांग निर्मिती केली, पंचांगातील पाच अंगे तिथी, वार, नक्षत्र, योग, करण भूगोल, खगोल, ज्ञान, विज्ञान, ज्योतिष शास्त्र, वास्तूशास्त्र वगैरे अभ्यास केला. हे शास्त्र खूप मोठे आणि गहन आहे.

हे सांगण्याचा हेतू नव्हता, पण सण, उत्सव कसे निर्माण झाले तर हे या सर्व नैसर्गिक गोष्टींमुळे याची उत्तरपत्रिका झाली असावी.

तात्पर्य असे की, माणूस हा समूहाने राहणारा प्राणी असल्याने त्याला एकत्र येण्यासाठी, आनंदी, रहाण्यासाठी सण व उत्सव यांचा फार मोठा सहभाग आहे.

निसर्ग आणि देव यांचे आभार मानून आपण सदैव त्यांचे ऋणी राहिले पाहिजे.



**या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।**



# पुण्याची ग्रामदेवता- तांबडी जोगेश्वरी

## (काळी व पिवळी जोगेश्वरी)

ज्योतिर्मय साहित्य

पुण्यामध्ये तांबडी जोगेश्वरी. काळी जोगेश्वरी व पिवळी जोगेश्वरी अशी तीन देवीचे मंदिर आहेत. तांबडी जोगेश्वरी, काळी जोगेश्वरी, पिवळी जोगेश्वरी असे रंगांचे नावे या जोगेश्वरी मंदिरांना का मिळाले? याच्या मागे एक रंजक कथा आहे. नवरात्र उत्सवानिमित्त पुण्यातील या तीन ऐतिहासिक जोगेश्वरीच्या मंदिराच्या कथा आणि आख्यायिका सांगत आहोत.आपल्यवर, गावावर येणारं संकट टाळावं म्हणून जुन्या काळी गावाच्या वेशी बाहेर ग्रामदेवतेचे मंदिर बांधायचे.आता शहराच्या विस्तारामुळे हीच मंदिरे पुण्याच्या मध्यभागी आली आहेत. ही मंदिरं ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार आहेत.


तांबडी जोगेश्वरी मंदिराला पुण्याचं ग्रामदैवत म्हटलं जातं. या मूर्तीचे मूर्तिकार कोण आहे? ही माहिती उपलब्ध नसल्यामुळे ही मूर्ती स्वयंभूच आहे अशी लोकांची खात्री झाली. ही मूर्ती उभी असून चतुर्भुज आहे. जोगेश्वरी, माहेश्वरी, सावित्री आणि चामुंडा या सर्व देवींचे एकत्रित असे स्वरूप या मूर्तीमध्ये बघायला मिळते. देवीच्या वरच्या दोन हातांपैकी डाव्या हातात डमरू आणि उजव्या हातात त्रिशूळ आहे. खालच्या दोन हातात मुंडके आणि कमंडलू आहे. मूर्तीच्या पार्श्वभागी एक दगड आहे. भविष्यपुराणात 'तां नमामि जगदधात्री योगिनी पर योगनी' अशा शब्दात योगेश्वरीचे वर्णन केलेले आढळते. योगेश्वरी म्हणजेच जोगेश्वरी. पेशवे यांचं कुलदैवत म्हणजे कोकणातल्या श्रीवर्धन इथली योगेश्वरी. मात्र त्यांचं वास्तव्य पुण्यात असल्यानं त्यांनी जोगेश्वरीला आणलं आणि तिलाच कुलदैवत मानू लागले. त्यामुळे कुठल्याही लढाईच्या आधी पेशवे इथे येऊन देवीचा आशीर्वाद घेऊन मग पुढे जायचे.

तांबडी जोगेश्वरी हे नाव कसं पडलं तर महिषासुराचे बारा सेनापती होते. त्यात ताम्रसुर नावाचा एक सेनापती होता. त्याचा वध या देवीने केला त्यामुळे या देवीला ताम्र जोगेश्वरी म्हणू लागले. पुढे जाऊन ताम्रचे तांबडी जोगेश्वरी झाले.

पुण्यात तांबडी जोगेश्वरी प्रमाणेच काळी जोगेश्वरीदेखील आहे. पुण्यातल्या काळ्या जोगेश्वरीची देखील अशीच रंजक कथा आहे. पेशवेकालीन असलेल्या या मूर्तीचे देखील वेगळे वैशिष्ठ्य आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई दत्त मंदिराच्या डाव्या हाताला काळ्या जोगेश्वरीचे मंदिर आहे. या मंदिराचीही रंजक कथा आहे. या जोगेश्वरीची मूर्ती जयपूरमधून बनवून आणली होती. या जोगेश्वरीच्या नाव काळी जोगेश्वरी




कसे पडले तर जोगेश्वरी ही श्री काळभैरव यांची पत्नी होती. काळभैरव हे शंकराचे उग्र रूप आहे. जोगेश्वरीच्या देवळात काळभैरवाची मूर्ती




असलेले हे एकमेव स्थान आहे. ही २ फुटाची मूर्ती आहे. तिचे दर्शन घ्यायला नवरात्रीत प्रचंड गर्दी होते. या परिसराला काळे वावर म्हणायचे आणि म्हणून तिला काळी जोगेश्वरी असे नाव पडले.

तांबडी जोगेश्वरी काळे जोगेश्वरी याप्रमाणे पुण्यात पिवळी जोगेश्वरी मंदिर आहे शुक्रवार पेठेमध्ये पंचमुखी मारुती चौकामध्ये पिवळी जोगेश्वरी देवीचं मंदिर आहे. हे मंदिर जवळपास २०० वर्षांपूर्वीचं असल्याचं म्हटलं जातं. तीन जोगेश्वरी मधली तिसरी जोगेश्वरी म्हणजे पिवळी जोगेश्वरी. शुक्रवार पेठेतील ही जोगेश्वरी पिवळी जोगेश्वरी म्हणून का ओळखली जाते, यामागे अतिशय सुरस कारण आहे. हे मंदिर खासगी असून महाजन कुटुंबाकडे आहे. साधारण २०० वर्षांपेक्षा जुने असलेले हे मंदिर अतिशय खास आहे. तुमचे लग्न ठरत नसेल तर मुलं मुली इथ येऊन देवीला नवस बोलायचे आणि त्यांचे हात पिवळे व्हायचे म्हणून पिवळी जोगेश्वरी असे नाव पडले.

पिवळी जोगेश्वरी ही लग्न जुळवण्यासाठी प्रसिद्ध आहे. या देवीला पिवळ्या वस्तू वाहण्याची परंपरा आहे. ज्यांचं लग्न जुळत नसेल किंवा विवाहात काही अडचणी येत असतील तर त्यांनी पिवळ्या तांदळाच्या पाच मुठी देवीसमोर वाहिल्यास त्याचं लग्न जुळून येतं, असं म्हटलं जातं.

# घटस्थापना व नवरात्रोत्सव : श्रद्धेचा दीप आणि स्त्रीशक्तीचा जागर

ज्योतिर्मय साहित्य

भारताचा प्रत्येक सण हा केवळ आनंदाचा क्षण नसतो, तर तो आपल्याला जीवन जगण्याची नवी दिशा देतो. नवरात्रोत्सव हा त्यापैकीच एक महत्त्वाचा उत्सव. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून घटस्थापनेने या उत्सवाची सुरुवात होते. त्या क्षणी प्रत्येक घरात, प्रत्येक अंतःकरणात एक नवी उर्जा, एक नवा प्रकाश जागतो. घटस्थापना हा हिंदू धर्मातील एक विधी आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदा या तिथीला स्वरूप घडा किंवा कलश याच्या ठिकाणी देवीची स्थापना केली जाते आणि याचे नऊ दिवस पूजन केले जाते. ताटात गंगाजलाने भरलेला कलश ठेवून आणि त्यात नाणी, सुपारी आणि कच्चा तांदूळ आणि हळद पावडर पासून तयार केलेले अक्षत भरतात. त्यावर आंब्याची पाच पाने आणि एक नारळ घालतात. शेवटी माँ शैलपुत्री आणि माँ दुर्गा यांची पूजा करतात आणि तेलाचा दिवा, अगरबत्ती, फुले, फळे, मिठाई आणि देशी तुपाचा विशेष भोग लावतात. तसेच आश्विन महिन्यात घटामध्ये देवीची स्थापना करून, नंदादीप प्रज्वलित करून आदिमायेची नऊ दिवस मनोभावे पूजा करणे, म्हणजेच घटस्थापना किंवा नवरात्रोत्सव. घटस्थापना दरम्यान लोक कलशात ''पवित्र पाणी'' भरतात. त्यानंतर कलशावर शेणाचा लेप केला जातो आणि त्यात बार्लीच्या बिया पेरल्या जातात. नंतर ते वाळूच्या खड्ड्यात ठेवले जाते. कलश हिंदू विधींमध्ये खोल प्रतीकात्मकता धारण करतो, विपुलता, समृद्धी आणि आध्यात्मिक शुद्धतेचे प्रतिनिधित्व करतो. हे पवित्र गंगा नदीच्या पाण्याने भरलेले आहे, जे जीवन टिकवून ठेवणाऱ्या दैवी उर्जेचे प्रतीक आहे. कलश हे दैवी पात्र म्हणून पूजनीय आहे आणि समारंभांमध्ये तांदळाच्या पलंगावर ठेवले जाते.

जेव्हा आपण मातीत बी पेरतो, तेव्हा ती छोटीशी हिरवी कोंब दिसण्यासाठी आपल्या डोळ्यांत किती प्रेम असतं! घटस्थापनेतले हे धान्य फक्त अन्नधान्याचे प्रतीक नसते, तर जीवनातील नव्या उमेदिचे, नव्या स्वप्नांचे आणि नव्या विश्वासाचे प्रतीक असते. कलशातील पाणी आपल्याला सांगते ''जीवन सतत वाहतं, अडथळे आले तरी थांबत नाही.'' आणि नारळ आपल्याला आठवण करून देतो ''कणखर आवरणातही गोडवा दडलेला असतो.'' नवरात्रीत आपण देवीच्या नऊ रूपांची पूजा करतो. परंतु ती देवी केवळ आकाशातील एखादी मूर्ती नसते, ती आपल्याजवळच असतेआपली आई, बहीण, पत्नी, मुलगी, शिक्षिका, कामगार स्त्री. तिच्या त्यागातून, तिच्या कष्टातून आणि तिच्या प्रेमातूनच खऱ्या शक्तीचा उगम होतो. घटस्थापना आपल्याला शिकवते की ज्या हातांनी संसार उभा राहतो, ज्या हृदयाने संसार सांभाळला जातो, त्याच हातांना, त्याच हृदयाला आपण वंदन करायला हवे.

नवरात्रीच्या रात्री गावोगावी होणारे जागर, भजनी मंडळींचे सूर, दांडिया-गरब्याची तालबद्ध पावलंहे सगळं एकच सांगतं, की माणूस एकटा आनंद शोधू शकत नाही. आनंद तेव्हाच खरा जेव्हा तो सामायिक केला जातो. देवीसमोर बसून केलेली सामूहिक आरती, सगळ्यांच्या डोळ्यांत चमकणारी श्रद्धाहीच खरी एकात्मतेची मूर्ती आहे. आज समाजात तणाव, भेदभाव, हिंसा वाढत चालली आहे. अशावेळी घटस्थापनेतून मिळणारा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो ''जसे धान्य मातीमध्ये पेरले की अंकुर फुटतो, तसेच प्रेम पेरले तर समाजात सौहार्द अंकुरतो.'' नवरात्रोत्सवाने आपण केवळ देवीची पूजा न करता, प्रत्येक स्त्रीला सन्मान द्यावा, प्रत्येक दुर्बलाला आधार द्यावा, हेच या सणाचे खरे पालन आहे.

नवरात्रीचे उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळे असतात आणि विशिष्ट संस्कार क्षेत्रांमध्ये भिन्न असतात, जरी त्यांना समान म्हटले जाते आणि एकाच देवतेला समर्पित केले जाते. सर्वात सामान्य उत्सव नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेने सुरू होतो, ज्याचा शाब्दिक अर्थ ''भांडगे चढवणे'' असा होतो. घटस्थापना पूजेचे महत्त्व आणि महत्त्व हे जीवनाच्या सर्व क्षेत्रात देवीचे सामर्थ्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करते. या व्यतिरिक्त हा चांगला आणि वाईट यांच्यातील लढाईच्या प्रारंभाचा उत्सव आहे. संपूर्ण सणात कलशाची पूजा केली जाते त्यानंतर दहाव्या दिवशी किंवा विजयादशमीला कलश विसर्जन केले जाते.

महाराष्ट्रात नवरात्रीची ही पोकळी भरून काढण्यासाठी, प्रबोधनकार, बोले आणि इतरांनी नवरात्र हा जनसामान्यांचा उत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली, प्रबोधनकारांनी शिवाजी महाराजांनी पूजलेल्या तुळजापूरच्या भवानीला महाराष्ट्राचे प्रमुख दैवत म्हणून धारण केले. हिंदूंना जातीपातीच्या ओलांडून एकत्र आणण्याची कल्पना होती. त्यांच्या चरित्रात, प्रबोधनकार असा दावा करतात की, शिवाजी महाराजांच्या काळात जरी नवरात्र साजरी केली जात असली तरी पुण्यातील ब्राह्मण पेशव्यांच्या काळात गणेशपूजेला प्राधान्य मिळाले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी नंतर सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून गणेश उपासना परंपरेचे पुनरुज्जीवन केले. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हा हा नवरात्रोत्सवासाठी प्रसिद्ध आहे. उत्सवादरम्यान शहर दिव्यांनी सजवले जाते आणि अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

नवरात्र हे साधारणपणे नऊ दिवसांचे असते पण तिथीचा क्षय झाल्याने ती

प्रविण बागडे
नागपूर

आठ दिवसांची किंवा वृद्धी झाल्यास दहा दिवसांची असू शकते. चंपाषष्ठीची म्हणजे खंडोबाची नवरात्र फक्त सहा दिवसांचे असते. सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे दैवतीकरण होऊन त्या शक्तिरूप मूर्तीला देवी असे नाव मिळाले आणि शाक्त संप्रदायी लोकांनी तिला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले. देवीची उग्र व सौम्य अशी दोन रूपे पहायला मिळतात. उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी ही देवीच्या सौम्य रूपांची नावे असून दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही देवीची उग्र रूपे आहेत. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी, कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धिदात्री अशी ही देवीची नऊ रूपे आहेत. मार्कंडेय पुराणातील देवी माहात्म्यात सांगितले आहे ''शरद ऋतूतील वार्षिक महापूजेत देवीमाहात्म्य भक्तिपूर्वक ऐकल्यास सर्व बंधनांपासून व्यक्ती मुक्त होते आणि धनधान्याने परिपूर्ण होते.

नवरात्र हा ऋतू परिवर्तनाचा काल असतो. यामुळे आपल्या नवीन शक्ती, नवा उत्साह, उमेद निर्माण होत असते. बृहत संहितेनुसार सूर्य तसेच इतर ग्रहांमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा प्रभाव मनुष्याच्या आरोग्यावर आणि व्यवहारांवर होत असतो. सृष्टीतील परिवर्तन हा शक्तीचाच खेळ आहे. ब्रह्मचर्य, संयम, उपासना, यज्ञ केल्याने शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढते. स्मरणशक्ती चांगली होऊन बौद्धिक विकास होतो. म्हणून नवरात्र हा शारीरिक व आत्मिक शुद्धतेचा काळ आहे असे मानले जाते. गुजरातमध्ये नवरात्री उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. दांडिया किंवा दांडिया रास हे गुजरातमधील लोकनृत्य आहे. हे समूहनृत्य विशेष करून नवरात्रात नाचले जाते. गुजरातमध्ये कोणत्याही सणाला किंवा शुभप्रसंगी हे नृत्य करण्याची परंपरा आहे. गरबा हा गुजरातमधील नवरात्री उत्सवातील पारंपरिक नृत्याचा प्रकार आहे. एका रंगीत घड्याला छिद्रे पाडून त्यात दिवा लावला जातो आणि त्याची पूजा केली जाते. या घड्याला गरबो असे म्हणतात.

गरबा खेळणे म्हणजे टाळयांच्या किंवा बहुधा लाकडी दांड्यांच्या लयबद्ध गजरामध्ये देवीची भक्तिरसपूर्ण गाणी म्हणणे. गरब्याच्या वेळी गोलाकार फेर धरून केलेले मंडल हे घटाचे प्रतीक असते, यांच्या मध्यभागी छिद्र असलेल्या रंगीबेरंगी मातीच्या घड्यात दिवे लावले जातात आणि त्याभोवती गोलाकार नाचण्याची पद्धत आहे. नवरात्र साधारणपणे देवीचे असते, पण इतर देवांची नवरात्रेही असतात. तुळजाभवानीचे नवरात्र दहा दिवसांचे असते, तशीच खंडोबाचे, व्यंकटेशाचे, नरसिंहाचे, दत्ताचे अशी इतरही नवरात्रे असतात. यापैकी नरसिंहाचे नवरात्र तीन ते नऊ दिवस, खंडोबाचे पाच किंवा सहा दिवस, बालाजी (व्यंकटेशाचे) दहा दिवस, दत्ताचे नऊ ते दहा दिवस असते. आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या नवरात्रीं खेरीज, आश्विन शुक्ल तृतीयेपासून सुरू होणारा सप्तरात्रोत्सव, पंचमीपासून सुरू होणारा पंचरात्रोत्सव आणि सप्तमीपासून सुरू होणारा त्रिरात्रोत्सव ही कमी-अधिक दिवसांची नवरात्रे असतात.

नवरात्री दरम्यान विशिष्ट रंग परिधान करणे शुभ मानले जाते, कारण प्रत्येक दिवसाचा एक वेगळा दुवा आणि महत्त्वपूर्ण आध्यात्मिक अर्थ आहे. नवरात्रीचा पहिला रंग हा उत्सव सुरू होणाऱ्या आठवड्याच्या दिवसानुसार निवडला जातो आणि उरलेले आठ दिवस पूर्वनिश्चित चक्रानुसार रंगवले जातात. नवरात्रीचे नऊ रंग पिवळे, हिरवे, राखाडी, केशरी, पांढरे, लाल, रॉयल ब्लू, गुलाबी आणि जांभळे आहेत. या रंगांचा उपयोग उत्सवादरम्यान पूजा केल्या जाणाऱ्या प्रत्येक देवींचे चित्रण करण्यासाठी केला जातो. सोमवार: पांढरा - स्वतःला पांढरी फुले आणि इतर वस्तूंनी वेढून घ्या. मंगळवार: लाल - तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्यासाठी आव्हाने स्वीकारा. बुधवार: तुमची प्रलंबित कामे अभ्यासण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी हिरवा दिवस चांगला आहे. गुरुवार: पिवळा - शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्यासाठी उत्कृष्ट दिवस. घटस्थापना ही फक्त एका कलशाची स्थापना नाही, तर ती आपल्या अंतःकरणात श्रद्धेचा दीप प्रज्वलित करण्याची प्रक्रिया आहे. नवरात्रोत्सव हा फक्त नऊ दिवसांचा उत्सव नाही, तो जीवनभर जपण्याजोगा संस्कार आहे. शक्तीची उपासना करून जर आपण स्त्रीला खरा मान, समाजाला खरी एकात्मता आणि निसर्गाला खरी जपणूक दिली, तर हाच उत्सव आपल्या जीवनाला खरं यश देईल. घटस्थापना आणि शारदीय नवरात्री तुमच्या आयुष्यात सुख, समृद्धी, शांती घेवून येवो, हीच सदिच्छा व घटस्थापना व नवरात्रोत्सवाच्या मंगल पर्वाच्या हार्दिक शुभेच्छा !

## आज देवीची सहावी माळ



ज्योतिर्मय साहित्य

सहाव्या माळेतील एक एक पुष्प गुंफत मातेचे रूप आपण डोळ्यात साठवूया.

षष्ठीचे दिवशी भक्ता आनंद वर्तला हो।

घेऊन दिवट्या हस्ती हर्षे गोंधळ घातला हो।

नवरात्र हा लोकसंस्कृतीचा ऊत्सव आहे. भक्ति ची परिसीमा गाठली गेली आहे. भक्तांना आनंद झाला आहे.मंगलमय क्षण किती साजरा करू कसकशा प्रकारे देवीची पूजा करू असे भक्ताला झाले आहे. आपल्या सेवेत काहीही कमी पडू नये ही भोळी भाबडी श्रध्दा मनी ठेऊन देवीची स्तुतीपर गीते गायली जात आहेत. त्यातुन एक लक्षात येते की जे जे निसर्गात मिळते ते ते अर्पण करून भक्त आपली साधना करून सेवा करत आहेत. देवीला कवड्याची माळ अर्पण केली जात आहे. हातात दिवट्या घेऊन नाचत गात भक्त ज्ञान व वैराग्याचा जोगवा मागत आहेत.

सौ.ऊज्वला धर्माधिकारी
पुणे

कवडीदेवी

काशीक्षेत्री कवडी देवी आहे. या देवीला कवडी अर्पण करतात. असे म्हणतात की आपले आयुष्य देखील कवडीमोल आहे. या मिळालेल्या आयुष्याचे सोने करणे आपल्या हातात आहे. आणि याची सतत जाणीव असणे गरजेचे आहे म्हणून भक्त गळ्यात कवड्याची माळ घालतात.

कवडी एक अर्पिता देसी हार मुक्ता फळा हो ।

जोगवा मागता प्रसन्न झाली भक्तकुळा हो ।।

असे हे कवडीचे अनुपम मोल आहे.

मानवी जीवनात शुभप्रसंगी जी रंगत

वाजंत्री, ढोलताशे, चौघडे वाजंत्री, शांतस्वराने येते त्याचे सुर कानाला हवेहवेसे वाटतात आणि वातावरणात एक प्रकारचे पावित्र्य निर्माण होते तेवढीच रंगत गोंधळ घालताना, जो संबळ वाजवला जातो जे तुणतुणं वाजवलं जाते त्यांच्या सुरांनी या लोकगीतात येते. हा तर आपला सांस्कृतिक ठेवा आहे.

मशालीची जळती पोत हातात घेऊन व मशालीत तेल घालण्यासाठी असलेला बुधली घेऊन जेव्हा गोंधळी देवीचा जागर करतो, देवीला भक्ताकडे येण्याचं आवाहन करतो तो क्षण भक्ताच्या भक्तिचा परमोच्च क्षण असतो

गोंधळी काही राजा नसतो पण तो एक कष्टकरी सर्व सामान्य माणूस असतो तो देवीला छत्रचामरे, माणीक मोती देऊ शकत नाही पण त्याची देवीप्रती भक्ति व आर्तता एवढी मोठी असते की

माता त्याला आशिर्वाद द्यायला नक्कीच येते.

भक्त काय म्हणतो बघा हं

माझ्या मातीच्या कुडाच्या भिंती असलेल्या झोपडीत ये.

बसायला साधी घोंगडी आणि भाजीभाकरीचा नैवैद्य मी तुला अर्पण करतो.

उदे गं अंबे उदे. गोंधळाला ये ।। गोंधळाला ये ।।

लोककलांच्या या आगळ्यावेगळ्या भक्तिची गीते ही संस्मरणीय ठरली.अनेक युगात ती साजरी केली.--- जोगवा मागुन भक्ति करणे ही तर आमची हिंदू संस्कृती आहे. माते पर्यन्त ही हाक पोहचली आणि काय आश्चर्य बघा !

त्रेलोक्याचा सांभाळ करणारी ही ऐश्वर्यसंपन्न माता पण !!!! गोंधळाला येते. भक्ताच्या भाजीभाकरीचा प्रसाद सेवन करते साध्यासुध्या घोंगडीवर बसते,भक्ताच्या घरच्या परडीचा सांभाळ करते. त्याच्या घरच्या गुळपाण्यानेही प्रसन्न होते. त्याच्या साध्याभोळ्या आदरातिथ्याने प्रसन्न होते. भक्तिचा जोगवा

घेणारी आणि आशीर्वाद देणारी आहे.

अन्नपूर्णेच्या रूपात जेव्हा ती प्रगट होते. समस्त प्राणी मात्रांचं रक्षण करते.

रावापासुन रंकापर्यन्त पोट भरणारी ही शाकंभरी आहे.

ज्ञान आणि वैराग्य देणारी आहे.शत्रुनाशिन्यै आहे धीर देणारी आहे व धीर धरायला लावणारी आहे.योगीजनांना योगा द्वारे आनंद देणारी आहे . भक्तांच्या शत्रुचा नाश करणारी आहे.चंद्र सुर्यआणि अग्नीसमान तेजस्वी दैदिप्यमानकांती असणारी अशी माता ही सर्व शक्तिनिशी त्रैलोक्याचे रक्षण करत आहे.

आरोग्य,धनधान्य, सुखशांती, संपत्ती देणारी सर्व प्राणीमात्रांचे मंगल करणारी महालक्ष्मीला माझा नमस्कार असो.

सर्व मंगल मांगल्ये
शिवे सर्वार्थ साधिके
शरण्यं त्रंबकेगौरी
नारायणी नमस्तुते।।

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559